सकाळ

Pune 10 April, 2020

# राजचंद्र मिशनकडून प्राण्यांची देखभाल

पुणे, ता. ९ : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर श्रीमद् राजचंद्र मिशन धरमपुरच्या वतीने पुण्यासह देशातील विविध शहरांत संस्थापक गुरुदेवश्री राकेशभाई यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सेवाकार्य करण्यात येत आहे. डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, पोलिस, कामगार आदींसाठी जगभरात ५०० स्वयंसेवक कार्यरत आहेत. तसेच प्राण्यांचीही देखील देखभाल करण्यात येत आहे.

आरोग्य कर्मचारी आणि पोलिसांना अन्न देणे, मास्क, सॅनिटायझर आदींचा पुरवठा तसेच मजूरांना तेल, मसाले, धान्य आदींचे वितरण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. पुढील महिनाभरात १५ लाख लोकांना आवश्यक खाद्य पदार्थांचे वितरण केले जाणार असल्याचे संस्थेच्या वतीने



सांगण्यात आले आहे.

## हॉस्पिटलला पुरविणार उपकरणे

वैद्यकीय सुविधांमध्ये कमतरता पडू नये. यासाठी संस्थेच्या वतीने व्हेंटिलेटर, एन ९५ मास्क, बायो सूट आदी साहित्य देण्यात येणार आहे. तसेच आवश्यक वैद्यकीय प्रशिक्षण आणि जागरूकता करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली आहे.